नि. दि. दा. क्र.१९०/२०१५
लताबाई उर्फ पुष्पा वि. बबन व ईतर

## निशाणी क्र.९४ खाली आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी क्र.१ बबन बाबुराव दोरगे यांचे वारसांना सदर दाव्यात रेकॉर्डवर/अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**२.** अर्जदार वादीचे म्हणणेनसार प्रतिवादी क्र.१ बबन बाबुराव दोरगे हे दि. २५.०३.२०२४ रोजी मरण पावले. सदरचा दावा हा वाटणीचा व स्वतंत्र कब्जाचा, खरेदीखत रद्द करण्याचा असल्याने प्रतिवादी क्र. १ यांचे वारस प्रतिवादी क्र.१अ अनुसया बबन दोरगे, प्रतिवादी क्र.१ब शालन बबन दोरगे यांना दाव्यात मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस असल्याने त्यांना दाव्यात सामील करून घेण्याची विनंती केली आहे. त्यांच्या म्हणणेनुसार सदर प्रस्तावित प्रतिवादी क्र.१अ व १ब या मयताच्या पत्नी आहेत.

**३.** सदर अर्जावर प्रतिवादी क्र.१ ते ४ व ८ च्या विधिज्ञांनी योग्य तो आदेश करण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.५, ६, ७, १० ते १६ विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला.

**४.** सदरचा दावा हा ताब्याचा, वाटपाचा, मनाईचा, खरेदीखत व हक्कसोड रद्द करण्याकरीता असुन प्रतिवादी क्र. १ हे वादीचे भाउ आहे. सदरचा दावा हा वाटपाकरीता असल्याने मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने तसेच त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. प्रतिवादी क. १ हे दि. २५.०३.२०२४ रोजी मरण पावले. त्या अनुषंगाने वादीने यादी निशाणी ९७ वर मृत्यु प्रमाणपत्राचा दाखला दाखल केला आहे. सदरचा अर्ज हा वादीने मुदत कायद्याचे कलम १२० च्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ मरण पावल्यापासुन ९० दिवसांचे आत दाखल

केला आहे. प्रतिवादींनी कोणताही विशेष आक्षेप घेतला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे.

५. दाव्याचे स्वरूप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा—या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जदारांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणारा आहे. करीता सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो. म्हणुन मी खालील आदेश पारित करतो :—

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येते.

२. वादीला आदेशित करण्यात येते की, अर्जातील नमुद मयत प्रतिवादी क्र. १ बबन बाबुराव दोरगे यांचे वारस नामे प्रतिवादी क्र.१अ अनुसया बबन दोरगे, वय ७८ वर्ष, प्रतिवादी क्र.१ब शालन बबन दोरगे वय ६८ वर्ष या वारसांना पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर घ्यावे.

सही/—

दि.११.०६.२०२४

(एस.एन.पाटील)
३रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर
दौंड

# Certificate

I affirm that the contents of this PDF file judgment is same word to word as per the original judgment.

**A.** Name of the Stenographer :- M.M. Chintale

**B.** Court :- 3rd Jt. CJJD, Daund

**C.** Judgment signed by P.O. on :- 11.06.2024

**D.** Judgment uploaded on :- 12.06.2024.